दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक १८६ वा बुधवार दि.०८ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## एक देश, एक निवडणूक; संसदीय समितीची आज पहिली बैठक !

नवी दिल्ली - एक देश, एक निवडणुकीच्या प्रस्तावाशी संबंधित २ विधेयकांच्या छाननीसाठी संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) स्थापन करण्यात आली आहे. त्या समितीची पहिली बैठक उद्या (बुधवार) आयोजित करण्यात आली आहे.

देशात एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेण्याच्या विषयावर प्रदीर्घ काळपासून चर्चा सुरू आहे. तो प्रस्ताव वास्तवात आणण्याच्या उद्देशातून केंद्र सरकारने २ विधेयके आणली. हिवाळी अधिवेशनावेळी ती विधेयके लोकसभेत मांडण्यात आली.




अधिक चर्चा करण्यासाठी ती विधेयके जेपीसीकडे पाठवण्यात आली. सरकारने भाजपचे खासदार पी.पी.चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली ३९ सदस्यीय जेपीसी स्थापन केली. त्यामध्ये प्रमुख पक्षांच्या खासदारांना सदस्य म्हणून स्थान देण्यात आले. जेपीसीचे सदस्य असणाऱ्या ठळक नावांमध्ये काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी, आपचे नेते संजय सिंह, शिंदेसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे, तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी आदींचा समावेश आहे.

आता संबंधित समिती कामकाजासाठी सज्ज झाली आहे. पहिल्या बैठकीत कायदा आणि न्याय मंत्रालयाचे अधिकारी विधेयकांमधील तरतुदींची माहिती देणार असल्याचे समजते.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी अशोक देडे



लातूर: पुणे येथे दर्पण दिनानिमित्त झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी अशोक देडे यांची नियुक्ती करण्यात आली. पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, 'एबीपी माझा'च्या संपादिका सरिता कौशिक, मावळते प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे, इलेक्ट्रॉनिक मीडिया सेलचे प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव आदींच्या प्रमुख उपस्थिती ही निवड करण्यात आली.

यावेळी नूतन प्रदेशाध्यक्ष म्हणून गोविंद वाकडे यांची निवड करण्यात आली. मावळते प्रदेशाध्यक्ष मुंडे यांचा कार्यकाळ संपल्याने वाकडे यांची निवड करण्यात आली. राज्यात सर्वाधिक सदस्य संख्या असलेल्या आणि पत्रकारांच्या प्रश्नावर नेहमी अग्रेसर असणारा संघ म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची ओळख आहे. तसेच संघाकडून पत्रकारांसाठी विविध उपक्रम राबवून बातमीच्या बदलत्या प्रवाहा विषयी कार्यशाळेच्या माध्यमातून प्रशिक्षणही दिले जाते. पत्रकारांच्या आरोग्याच्या दृष्टीने विमा, हेल्मेट सुविधाही पुरवल्या जातात. सदर संघ महाराष्टाबरोबर गुजरात, गोवा आणि दिल्ली प्रदेशातही विस्ताराला असून, त्या राज्यात जिल्हा शाखाही कार्यरत आहेत. पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वी प्रदेशाध्यक्ष म्हणून राजू परुळेकर, राजा माने, गोविंद घोळवे, गणेश जोशी आदी पत्रकारांनी आपल्या कार्याची उत्कृष्टपणे धुरा सांभाळी आहे.

अशोक देडे गत १७ वर्षांपासून लातूरचे जिल्हाध्यक्ष असून, त्यांनी जिल्हा, मराठवाडा आणि राज्यस्तरीय उपक्रम राबवून आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवण्याबरोबरच उत्कृष्ट संघटक म्हणून आपली राज्यभरात ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे राज्यकार्यकारिणीने त्यांची राज्याच्या उपाध्यक्षपदी निवड केली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल लातूर जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, श्रीधर स्वामी, शहराध्यक्ष महादेव डोंबे, संघटक सुधाकर फुले, कोषाध्यक्ष अरुण कांबळे, यांनी नूतन प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी अशोक देडे यांची निवड झाल्यानंतर सत्कार करताना पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, 'एबीपी माझा'च्या संपादिका सरिता कौशिक, नूतन प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, इलेक्ट्रॉनिक मीडिया सेलचे प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, आदी.

## न्याय हक्कासाठी त्यांनी राज्य महामार्गावर केले आंदोलन.

### संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकर्यावर कठोर कारवाई करावी.

चाकूर /प्रतिनिधी:-मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचा खुन केलेल्या सर्व गुन्हेगारांना अटक व परभणी येथील मानवी हक्कांची पायमल्ली केली त्यांच्यावर कठोर कारवाई करवी या मागणीसाठी चाकुर तालुक्यातील महाळंग्रा पाटी येथे राष्ट्रीय महामार्गावर दि. ७रोजी सकाळी १० वाजता एक तास रास्ता रोको करण्यात आला. या रास्ता रोको आंदोलनात सर्वपक्षीय नेते व नागरिक उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची लांब रांगा लागल्या होत्या.



परभणी येथे संविधान शिल्पाची तोडफोड झाल्यामुळे संविधानप्रेमी नागरीकांनी केलेले निषेध आंदोलन हाणून पाडण्यासाठी पोलीसांकडून बळाचा वापर करुन कोबिंग ऑपरेशनच्या नावाखाली अमानुष लाठीचार्ज केला. अमानुष मारहाणीमुळे वडार समाजातील विधी शाखेत शिकणारा तरुण सोमनाथ सुर्यवंशी या युवकाचा बळी गेला. पोलीसांनी केलेल्या अमानुष लाठीचार्ज यामुळे मानवी हक्काची पुर्णपणे पायमल्ली झाली आहे. या प्रकरणाची चौकशी व्हावी म्हणून नागरीकांकडून मोर्चा, धरणे या संवेदनशील मार्गाने आंदोलन होऊन देखील तसा तपास होत नाही. मस्साजोग ता. केज जि.बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निघृण हत्या प्रकरणाचा खटला निःपक्षपातीपणे चालण्यासाठी इतर जिल्ह्यात वर्ग करण्यात यावा. संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपींचे लागेबांधे मंत्री धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्याशी सकृत दर्शनी दिसत असल्याने प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत या दोघांना मंत्री मंडळातून बडतर्फ करावे बीडचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षकांवर कार्यवाही करुन त्यांना प्रशासनातून बडतर्फ करावे. संतोष देशमुख यांच्या कुटूंबास पन्नास लाख रुपये आर्थीक मदतीसोबत कुटूंबातील सदस्यास शासकीय नोकरी द्यावी.याची दखल महामहिम राज्यपाल यांनी घ्यावी अशा अशयाचे निवेदन तहसीलदार यांच्यामार्फत राज्यपाल यांना देण्यात आले.निवेदन स्विकारण्यासाठी नायब तहसीलदार दिगंबर स्वामी, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे मंडळाधिकारी एम.पी .सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

## दगडू लक्ष्मण बचुटे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील शेलगाव गांजी येथील रहिवाशी दगडू लक्ष्मण बचुटे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. दिनांक ५ जानेवारी रोजी रात्री ९-०० वाजण्याच्या सुमारास दगडू लक्ष्मण बचुटे वय ६९ वर्ष यांचा मृत्यू



झाला. मंगळवारी सकाळी ठीक ८-०० वाजता रक्षा सावरण्याचा विधी संपन्न झाला तर दुपारी १२-०० वाजता जलदान विधी संपन्न झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी घेतला तंबाखू नियंत्रण समिती कामाचा आढावा

लातूर, दि.७ :- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम व राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची आढावा बैठक सोमवारी झाली. या बैठकीमध्ये राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत वर्षभरातील विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी यांनी घेतला. तसेच मौखिक आरोग्य कार्यक्रमाचाही सविस्तर आढावा घेण्यात आला.



जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये व कार्यालयीन परिसर तंबाखू मुक्त ठेवण्यासाठी सर्व कार्यालय प्रमुख यांनी कोटपा २००३ कायद्यानुसार दंडात्मक कार्यवाही करावी, असे आदेश दिले. तसेच जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्था तंबाखूमुक्त करून शालेय विद्यार्थी यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी शालेय प्रशासनाने प्रयत्नशील राहावे. जिल्ह्यातील सर्व शाळा तंबाखूमुक्त करण्याच्या सूचना शिक्षण अधिकारी व शिक्षण विभाग यांना दिल्या.

या बैठकीला जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ए. जे. तडवी, पोलीस उपाधिक्षक गजानन भातलवंडे, अन्न व औषधी विभाग सहाय्यक आयुक्त प्रशांत काकडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे ,वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, डॉ आनंद कलमे तसेच सर्व तालुका स्तरीय गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचा पाया पक्का असणे गरजेचे- उपजिल्हाधिकारी महेश घाटूळे




केज/प्रतिनिधी - बनेश्वर शिक्षण संस्था संचलित महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा येथे शालेय अंतर्गत क्रीडा स्पर्धा २०२४-२५या स्पर्धेसाठी उद्घाटक म्हणून २०२३ राज्यसेवा परीक्षा राज्यातून प्रथम आलेले श्री महेश घाटूळे उपजिल्हाधिकारी हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते. मुलांना मार्गदर्शन करत असताना त्यांनी आपल्या सहज सोप्या भाषेमधून विद्यार्थ्यांना आपलं शाळेतील बालपण अगदी सहज सांगितलं. बनेश्वर शिक्षण संस्था संचलित गुरुदेव विद्यालय मोरेवाडी या शाळेचे ते माजी विद्यार्थी आहेत. त्यांचे गुरुवर्य श्री मनेश गोरे सर व विशाल माने सर यांच्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. आठवणी सांगत असताना विद्यार्थ्यांना त्यांनी आवर्जून सांगितले की स्पर्धा परीक्षेसाठी सामाजिक शास्त्र हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे इयत्ता पाचवी ते दहावी मधील सामाजिक शास्त्र या विषयाचं महत्त्व त्यांनी आवर्जून विशद केले. तसेच गणित, विज्ञान, इंग्रजी याही विषयांचे त्यांनी महत्त्व मुलांना सांगितले. अभ्यास करत असताना स्वतःमधील असणाऱ्या सुप्त गुणांना शाळेमध्येच आपण त्यांना वाव दिला पाहिजे म्हणजे भविष्यात आपल्याला कुठल्याही बाबीची कमतरता भासत नाही किंवा भीती वाटत नाही हे त्यांनी सांगितले. शालेय जीवनातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेत असताना ज्या विद्यार्थ्यांचा मूळ पाया पक्का आहे या विद्यार्थ्यांना भविष्यात कोणत्याही विषयाची अडचण येत नाही. गुरुदेव विद्यालय मोरेवाडी या ठिकाणावर या शाळेत झालेल्या संस्कारामुळे ते भविष्यात जिद्द घेऊन अभ्यासाला लागले. यामध्ये त्यांचे माता,पिता व गुरुजनांचे सहकार्य होते हे त्यांनी विशद केले. एक गुणाचे महत्त्व त्यांनी सांगत असताना राज्यामध्ये उपजिल्हाधिकारी पदाची एकच जागा होती. लाखभर विद्यार्थ्यांपैकी ती जागा फक्त जो विद्यार्थी राज्यात सर्वप्रथम येणार आहे त्याच विद्यार्थ्याला ती जागा मिळणार होती आणि ती जागा श्री महेश घाटूळे यांनी एमपीएससी २०२३ मध्ये राज्यात सर्वप्रथम येऊन मिळवली. जर त्यांना राज्यातून दुसराही क्रमांक मिळाला असता तर या पदाला त्यांना गवसणी घालता आली नसती हे त्यांनी आवर्जून सांगितले. यामध्ये विद्यार्थ्यांनी गुरुजनांनी सांगितलेल्या मार्गावर आपण नम्रपणे जिद्द घेऊन चिकाटीने पुढे अभ्यास केला तर निश्चित यश मिळतेच हे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष भागवत दादा गोरे उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिंदे मॅडम, ज्येष्ठ शिक्षक आर. एम. काकडे सर सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी हे या कार्यक्रमात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचलन काकडे केशव सर यांनी केले.या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून लाभलेले उपजिल्हाधिकारी श्री महेश घाटोळे सरांमुळे मुलांमध्ये एक नवचेतना निर्माण झाली. अशा पद्धतीने महाराष्ट्र विद्यालय मध्ये आज दरवर्षीप्रमाणे शालेय अंतर्गत क्रीडा स्पर्धेस सुरुवात झाली.

## संपादकीय....

# राजकारण्यांना तळ्यावर आणा

अतिप्रचंड बहुमत मिळालेले सत्ताधारी जनतेची जरासुद्धा तमा बाळगत नाहीत हा यापूर्वीचा अनुभव आहे. आता तोच अनुभव पुन्हा राज्यातील जनतेच्या प्रत्ययाला येत आहे. कालच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या रोखठोक शैलीला साजेसे विधान केले. मात्र त्यांनी हे विधान एका जाहीर कार्यक्रमात त्यांना निवेदन देण्याचा प्रयत्न करणार्या काही लोकांना उद्देशून जाहीर व्यासपीठावरून केले. त्यांचा हा रोख सरसकटच सर्व मतदारांना उद्देशून असावा असे त्यातून ध्वनीत झाले आहे.

अजित पवार यांचे हे विधान आश्चर्यकारक आहे. ते व्यासपीठावरून आपले ताळतंत्र सोडताना पूर्वी कधी दिसले नाहीत. खूप दिवसांपूर्वी धरणातील पाण्याच्या विषयावरून त्यांनी जे आक्षेपार्ह विधान, बोलण्याच्या ओघात केले होते त्याबद्दल त्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीपाशी जाऊन एक दिवसाचे उपोषण करून प्रायश्चित्त घेतले होते. म्हणजेच अजितदादा यांना आपल्या विधानाची चूक लक्षात आली होती आणि ती त्यांनी संवेदनशीलपणे निस्तरली होती. त्यानंतर आजतागायत ते व्यासपीठावरून संयमच बाळगताना दिसत होते.

पण अलीकडे मात्र त्यांचा संयम पुन्हा ढळू लागल्याचे दिसून येत असून ते जनतेला आणि मतदारांनाही सुनवायला मागेपुढे पाहत नाहीत, असे वरील विधानावरून स्पष्ट होते. जनता ज्यांना मतदान करते आणि जे सत्ताधारी असतात त्यांच्याकडेच आपले म्हणणे मांडण्यासाठी जात असते. संबंधित मंत्री मतदारांना सहजासहजी भेटत नाहीत. त्यामुळे जिथे जिथे शक्य असेल तिथे त्यांना भेटून आपले म्हणणे किंवा गार्हाणे त्यांच्यापुढे मांडण्याचा जनतेचा प्रयत्न असतो. लोकप्रतिनिधींकडे आपली मागणी करणे म्हणजे त्या लोकप्रतिनिधीला कमी लेखण्याचा किंवा आपण त्यांचे मालक झालो आहोत असा अविर्भाव जनसामान्यांचा कधीच नसतो.

पण दादांचा संयम सुटला आणि त्यांनी जागेवरच सुनावले. हा प्रकार एकीकडे झाला असतानाच दुसरीकडे महायुतीतल्या शिवसेनेच्या एका आमदाराने तर मतदारांना चक्क तवायफची उपमा दिली आहे. मतदार दोन दोन पाच पाच हजारांत विकले जातात, ते दारू मटन चिकन असल्या क्षुल्लक गोष्टींवर सुद्धा विकले जातात, त्यामुळे मतदारांची औकात एखाद्या तवायफासारखी झाली आहे, असे विधान या महाशयांनी काढले आहे. हासुद्धा निवडून आलेला आमदार आहे, तो पराभूत झालेला आमदार असला असता आणि त्याने एक वेळ असे विधान केले असते, तर कदाचित लोकांनी ते समजून घेतले असते. पण निवडून आलेल्या आमदाराने मतदारांची अशी अवहेलना करणे सर्वथा अयोग्य आहे.

किंबहुना नजीकच्या भविष्यात सत्ताधारी महायुतीला अशा बेजबाबदार विधानांचा फटका बसू शकतो. पण आता प्रचंड बहुमताने पुढची किमान पाच वर्षे आपल्या ताब्यात सत्ता असल्याने या सत्ताधारी मंडळींचा एकूणच कल बेजबाबदारीने वागण्याकडे चालला आहे. जनतेला खिसगणतीत धरायचे नाही ही एक नवी रीत सध्या रूजू पाहते आहे. निवडणुका जिंकण्यासाठीचे फंडे राजकीय पक्षांच्या आता चांगले अंगवळणी पडले आहेत त्यामुळे जनतेला कसे झुकवायचे आणि त्यांना आपल्या बाजूला कसे ओढायचे यात हे राजकारणी तरबेज झाले आहेत. त्यामुळे एकदा निवडून आल्यानंतर जनतेला खिसगणतीत ठेवणे त्यांना गरजेचे वाटेनासे झाले आहे.

वरील विधानांमधून सत्ताधार्यांची हीच बेफिकिरी झळकताना दिसते. बीडमध्ये सध्या जे सुरू आहे त्याचे रोज नवनवीन खुलासे समोर येत आहेत. एका तरुण सरपंचाची अमानुष हत्या झाली या प्रकरणी संबंधित मंत्री आणि आरोपींवर कारवाई व्हावी या मागणीसाठी लाखोचे मोर्चे ठिकठिकाणी निघत आहेत. बीड, परभणी पाठोपाठ पुण्यातही असाच 'जन आक्रोश' मोर्चा झाला. पण या मोर्चाची दखल घेण्याची गरज सत्ताधार्यांना वाटत नाही. मतदार किंवा जनतेला गृहीत धरण्याची प्रवृत्तीच याला कारणीभूत आहे.

राजकीय पक्षांनी एकमेकांच्या विरोधात गरळ ओकणे हा समजा त्यांच्या राजकारणाचा भाग मानला तरी, राजकारण्यांनी थेट मतदारांनाच धुडकावणे किंवा त्यांचा सरसकट अवमान करणे हे मात्र कुठल्याही गणितात बसणारे नाही आणि म्हणूनच ते मान्य करता येणार नाही. अजित पवारांच्या विधानावरून आता या पुढील काळात वातावरण तापत जाईल, मग त्यानंतर तरी किमान अजितदादा आपले विधान मागे घेतील काय हे पाहावे लागेल. शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनाही त्यांच्या विधानाबद्दल त्यांच्या पक्षश्रेष्ठीकडून जाब विचारला जावा अशी अपेक्षा आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, काही मतदार प्रलोभनाला बळी पडत असतीलही; पण सरसकट सगळे मतदार किंवा जनता ही प्रलोभनानुसारच मतदान करते असे मानणे गैर आहे. किंबहुना मतदारांनीच आता अशा लोकप्रतिनिधींना लक्षात ठेवून आपण कुठल्याच प्रलोभनाला बळी न पडता चांगले काय आणि वाईट काय हे नीट जोखूनच मतदान करतो हे दाखवून देण्याची वेळ आली आहे.

प्रचंड बहुमताच्या आधारावर बेफाम होणार्या लोकप्रतिनिधींच्या पार्श्वभूमीवर मतदारांनी आता अधिक सजगता आणि जागरूकता बाळगण्याची गरज आहे. मतदारांना गृहीत धरून चालणार्या राजकारण्यांना ताळ्यावर आणण्याचे काम शेवटी मतदारांनीच करायचे असते आणि हे काम त्यांनी जबाबदारीने पार पाडायचे असते हा मुद्दाही मतदारांनी लक्षात घेणे गरजेचे आहे.

# गुन्हेगाराचा वावर

सुमारे बत्तीस वर्षांपूर्वी गोपीनाथ मुंडे यांनी राजकारणातील गुन्हेगारांचा वावर आणि वापर या विषयावरून रान उठवलं होतं. मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक असतानाही मुंडेंचा रोख मात्र असायचा तत्कालीन संरक्षण मंत्री शरद पवार यांच्यावर! पण आता बत्तीस वर्षांनी गोपीनाथ मुंडेंचे पुतणे धनंजय मुंडेना त्याच प्रकारच्या आरोपांना तोंड द्यावं लागतं आहे.

वाल्मिक कराड हे धनंजय मुंडे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी. धनंजय मुंडेंनी त्यांचे काका गोपीनाथ मुंडे यांना सोडून स्वतंत्रपणे राजकारणाची सुरुवात केल्यापासून वाल्मिक कराड हे त्यांच्यासोबत आहेत. ९ डिसेंबर रोजी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली. त्यानंतर दोन दिवसांनी वाल्मिक कराड, विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्याविरुद्ध दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल झाला. मस्साजोग येथे पवनचक्की प्रकल्प उभारणार्या अवादा एनर्जी कंपनीच्या कर्मचार्यांनी ही तक्रार दाखल केली होती.



त्याआधी ६ डिसेंबर रोजी याच अवादा एनर्जीच्या आवारात सरपंच संतोष देशमुख आणि त्यांच्या हत्येचा आरोप असलेल्यांमध्ये वाद झाला होता. याच वादातून संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आल्याचा आरोप भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला आहे. अर्थात, सत्तेच्या मदाने मातलेले असे खंडणीखोर, गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक सर्वत्र आढळतात. त्यांच्या अशा कृत्यांना राजकीय आशीर्वाद असल्याचही बोललं जातं.

महाराष्ट्रातील पहिली राजकीय हत्या म्हणून आमदार कृष्णा देसाई यांचा उल्लेख केला जातो. आचार्य अत्रेंच्या 'मराठा' दैनिकानं ही बातमी छापली होती. हत्येचा बाळासाहेब ठाकरेंनीही निषेध नोंदवला. पुढे श्रीधर खोपकर, श्रीधर नाईक, सत्यविजय भिसे असे अनेक वादग्रस्त राजकीय खून महाराष्ट्रात झाले. आरोपाची सुई अनेक मोठ्या व्यक्तींकडे फिरली. त्यात अनेक गणमान्य व्यक्तींचा समावेश होता.

असे खून, हत्या प्रत्येक जिल्ह्यात, गावात पाहायला मिळू शकतात ज्याच्या मागे कोणती तरी राजकीय शक्ती असल्याचा आरोप नेहमी केला जातो. पण न्यायालयात कधीही हत्येमागच्या राजकीय शक्तींना शिक्षा मिळाल्याचं ऐकिवात नाही. आज त्याच यादीत संतोष देशमुख यांचा समावेश झाला आहे, असं म्हटलं पाहिजे. यापलीकडे काही होईल असं वाटत नाही.

या राजकीय हत्यांचे आरोप, शिंतोडे अगदी मोठ्या नेत्यांवरसुद्धा उडाले आहेत. गुजरातचे माजी मंत्री हरेन पंड्या यांच्या हत्येनंतर हाच प्रकार घडला होता. भाजप हा एक विचारधारा राखणारा पक्ष नसून एका व्यक्तीची संघटना असल्याचा आरोप हरेन पंड्या यांच्या पत्नी जागृतीबेन यांनी केला होता. 'माझ्या पतीची हत्या ही राजकीय हत्या होती.

गेल्या दहा वर्षांपासून मी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर लढाई लढत आहे पण व्यर्थ आहे. तथापि, मी लढत राहीन.' तेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री असलेले नरेंद्र मोदी यांनी आजपर्यंत त्यांच्या कुटुंबाप्रती सद्भावना दाखवली नाही, असेही त्या म्हणाल्या होत्या.

पंड्या यांचा पूर्णाकृती पुतळा एलिस ब्रीज भागात उभारण्यात आला. कार्यक्रमाला स्वत: मुख्यमंत्री नरेंद्र मोदी हजर होते. पंड्या परिवार होता. पण भाषणावेळी पंड्या परिवार सभास्थानाहून निघून गेला. पंड्याची पत्नी जागृती पंड्याने २०१२ मध्ये गुजरात परिवर्तन पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. गुजरातचे माजी गृहराज्य मंत्री गोवर्धन झडफिया यांचं एक विधान ढहश लरीरींरप या नियतकालिकात प्रसिद्ध झालं होत. ते म्हणतात, हरेन पंड्यांची हत्या कुणी केली, याबाबत माझ्याकडे पुरावा नाही. पण वस्तुस्थिती कायम आहे.


आता न्याय मिळेल, मिळालाच तर किती वर्षांनी मिळेल? हा प्रश्न मनात येण्याचं कारण सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या आकडेवारीनुसार, देशातील ५,२८१ लोकप्रतिनिधींपैकी गुन्हेगारी खटल्यांचा सामना करणार्या विद्यमान लोकप्रतिनिधींची संख्या अडीच हजारांहून जास्त आहे आणि यात राज्यातील माजी खासदार आणि आमदारांचाही समावेश केल्यास ही संख्या ४,४४२ वर पोहोचते.

भारतातील सर्व राज्यांत मिळून एकूण ४१२६ विधानसभा सदस्य, ३६७ विधान परिषद सदस्य, लोकसभा ५४३ आणि राज्यसभा २४५ असे एकूण ५,२८१ लोकप्रतिनिधी याव्यतिरिक्त पंचायतीच्या सर्व स्तरांवर सुमारे ३० लाख निवडून आलेले प्रतिनिधी त्यात सुमारे १३ लाख महिला आहेत. अर्थात, अगदी स्थानिक स्वराज्य संस्थांपासून संसदेपर्यंत निवडून आलेल्या सर्वांचा विचार केल्यास गुन्हेगारी स्वरूपाचे खटले दाखल असलेल्या लोकप्रतिनिधींची संख्या सहजगत्या दहा लाखांच्या वर जाऊ शकते. हीच आकडेवारी सर्वात भयानक, भयावह आणि लोकशाहीला घातक आहे.

'राजकारणाचे गुन्हेगारीकरण' हा शब्द मला पटत नाही. मी त्याला 'गुन्हेगारांचे राजकारणीकरण' म्हणतो. उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये सर्वाधिक आमदार (वर्तमान आणि माजी) आहेत ज्यांच्यावर फौजदारी खटले आहेत म्हणून गाय पट्ट्याला दोष देणं मला पटत नाही. महाराष्ट्रातील अनेक घटनांकडे नजर टाकली तर लक्षात येईल की महाराष्ट्रातील कायदा

# प्रकल्पातील आव्हाने

चीनशी संबंध म्हणजे एक शून्याचा पाढा आहे. भारत-चीन सीमेबाबत चीन घुसखोरी केलेल्या भागातून परत गेल्यानंतर भारत-चीन संबंध सुधारतील अशी आशा निर्माण झाली होती. मात्र चीन सतत भारतावरती मानसिक दबाव टाकत आहे. सीमा विवाद करार झाल्यानंतर चीनने पुन्हा एकदा भारताला आठवण करून दिली की, चीन भारताविरुद्ध वॉटर वॉर सुरूच ठेवेल. एक घोषणा करण्यात आली की एक महाकाय धरण चीन ब्रह्मपुत्रेवर भारत-चीन सीमेवर बांधत आहे. चीन भारताकडे केवळ एक आर्थिक बाजारपेठ म्हणून बघतो, एक बरोबरीचा देश म्हणून नाही.



हे जगातील सर्वात मोठे जलविद्युत धरण असेल. चीनचे धरण तिबेट स्वायत्त प्रदेशातील यारलुंग त्सांगपो नदीवर बांधण्यात येईल. यारलुंग त्सांगपो तिबेटच्या पठारावरून वाहते आणि नंतर अरुणाचल प्रदेशातून ती आसाममध्ये प्रवेश करते, जिथे तिला ब्रह्मपुत्रा नदी म्हणतात. धरण थ्री गॉर्जेस धरणापेक्षा तिप्पट ऊर्जा निर्माण करेल. थ्री गॉर्जेस धरण दरवर्षी ८८.२ अब्ज किलोवॅट वीज निर्माण करते.

प्रस्तावित धरण दरवर्षी ३०० अब्ज किलोवॅट वीज निर्मिती करू शकेल. जलविद्युत प्रकल्पाची किंमत एक ट्रिलियन युआनपेक्षा (१३७ बिलियन डॉलर्स) जास्त असू शकते. ही किंमत जगभरातील कोणत्याही पायाभूत सुविधा प्रकल्पापेक्षा जास्त आहे. त्या तुलनेत, थ्री गॉर्जेस धरणातील गुंतवणूक २५४.२ अब्ज युआन (३४.८३ अब्ज डॉलर्स) होती. बांधकाम कधी सुरू होणार आणि धरणाचे नेमके ठिकाण काय, हे अद्याप स्पष्ट नाही.

चीनच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे, पण तो भारताच्या दृष्टीने धोकादायक आहे. एकदा हे धरण बांधून पूर्ण झाले की ब्रह्मपुत्रेचे पाणी चीन हवे तेव्हा रोखू शकेल, हवे तिकडे वळवू शकेल. या पाण्यावरील नियंत्रणातून चीनच्या हाती अरुणाचल आणि आसामच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम करण्याची शक्ती प्राप्त झाली आहे. पर्यावरणावर होणारे प्रतिकूल परिणाम हा तर वेगळाच भाग आहे, ज्यामुळे भारत आणि बांगलादेशातील लाखो लोक प्रभावित होऊ शकतात. याबद्दल भारताने वेळोवेळी चीनशी चर्चा केली आहे.

चीनने तसे काही होणार नाही असे वेळोवेळी आश्वस्तही केले आहे. पण चीनची वीज आणि पाण्याची प्रचंड तहान पाहता त्या आश्वासनांवर किती विसंबून राहायचे हा प्रश्नच आहे. चीनने तिबेटमधील ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वात मोठे धरण बांधण्याच्या आपल्या योजनेचा बचाव केला. हे धरण चीनच्या ग्रीन आणि कमी कार्बन ऊर्जा संक्रमणातील एक मोठे पाऊल आहे.

प्रकल्पातील आव्हाने

हा जलविद्युत प्रकल्प उभारताना चीनला अनेक तांत्रिक आणि अभियांत्रिकी आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. यारलुंग झांगबो नदीचा एक भाग दोन हजार मीटर (६,५६१ फूट) उंचीवर आहे. त्यामुळे या भागावर धरण उभारणे मोठे आव्हान असणार आहे. नदीचा अर्धा प्रवाह सुमारे २ हजार घनमीटर प्रति सेकंद या वेगाने वळवण्यासाठी बरवा पर्वतापासून जवळपास २० किलोमीटर लांब बोगदे काढावे लागतील.

भारत आणि बांगलादेश चिंतेत

या प्रकल्पाबाबत चीनच्या पारदर्शकतेच्या अभावामुळे भारताची चिंता वाढली आहे. तिबेट धरणामुळे अचानक पूर येऊ शकतो किंवा पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती आहे. ब्रह्मपुत्रा भारत, बंगलादेश आणि चीनच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी महत्त्वाची नदी आहे. भारतातील गोड्या पाण्याच्या संसाधनांपैकी जवळपास ३० टक्के आणि एकूण जलविद्युत क्षमतेपैकी ४० टक्के या नदीचा वाटा आहे. चीनसाठी देशाच्या एकूण गोड्या पाण्याच्या पुरवठ्यामध्ये ब्रह्मपुत्रेची भूमिका मर्यादित आहे, परंतु तिबेटच्या ऊर्जा उद्योगांमध्ये ही नदी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

वाढत्या लोकसंख्येमुळे दोन्ही देशांमध्ये जलस्रोतांचा ताण आणि मागणी वाढत आहे. ब्रह्मपुत्रेवर नियंत्रण ठेवण्यासाठी जलविद्युत धरणांचा वापर करण्याच्या चीनच्या इराद्याबद्दल भारताने फार पूर्वीपासून चिंता व्यक्त केली आहे. चीनच्या प्रस्तावित धरणाचा पाण्याच्या प्रवाहावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी, भारत अरुणाचल प्रदेशमध्ये १२ जलविद्युत केंद्रे बांधण्याची योजना आखत आहे.

'नामचा बारवा'मध्ये नवे बोगदे

चीनने भारतीय सीमेजवळ तिबेटमधील ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वात मोठे धरण बांधण्यास मान्यता दिली, ज्याचे जगातील सर्वात मोठे पायाभूत प्रकल्प म्हणून वर्णन केले जात आहे. या जलविद्युत प्रकल्पातून वर्षाला तब्बल ३०० अब्ज किलोवॅट वीजनिर्मितीचे चीनचे उद्दिष्ट आहे. या महानदीने तयार केलेल्या जगातील सर्वात खोल दरीनंतर उलट दिशेने नदीचा प्रवास सुरू होतो. या दरीमध्ये प्रचंड मोठी भिंत बांधण्यात येणार असून वीजनिर्मितीसाठी २० किलोमीटर लांबीचे चार ते सहा महाकाय बोगदे 'नामचा बारवा' डोंगररांगांमध्ये खणावे लागणार आहेत.

वॉटर- एशियाज न्यू बॅटलफिल्ड

ब्रह्मपुत्रेच्या पाण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात समझोता झाला असला, तरी, चीन कोणतीच गोष्ट कधी पाळत नाही. म्हणूनच चीनला आवर घालणारी गरज आहे, तरच जगाचा निभाव लागायची शक्यता आहे. चीन आणि भारत संघर्षाच्या काळात चीनने ब्रह्मपुत्रेतून अचानक पाणी सोडून कृत्रिम पुराचं संकट निर्माण केलं तर त्याचा फटका लाखो लोकांना बसू शकतो. मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी होऊ शकते. त्यामुळे ब्रह्मपुत्रेवरील सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यावर भारताला करडी नजर ठेवावी लागेल.

प्रसंगी उपग्रहांची मदत घेऊन ब्रह्मपुत्रेच्या पात्रावर आणि तिच्यावरील धरणांवर लक्ष ठेवावं लागेल. तज्ज्ञांचं पथक नेमून त्याकडे ही जबाबदारी द्यावी लागेल. कमी पावसाच्या काळात पाणी सोडलं नाही तर अरुणाचल प्रदेशातील अप्पर सियांग आणि निम्न सुहांस्त्री योजनांवर परिणाम होऊ शकतो. अशा वेळी या योजनांच्या पाण्याचं काय करायचं, याचा विचारही भारत सरकारला करावा लागेल.

'वॉटर- एशियाज न्यू बॅटलफिल्ड' या पुस्तकाचे लेखक ब्रह्म चेलानी यांनी या आधीच हा धोका अधोरेखित केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, चीन या पाण्याचा वापर राजकीय अस्त्र म्हणून करते की नाही हा भाग वेगळा. पण त्या क्षमतेचा वापर करून तो देश आपल्या शेजारी राष्ट्रांना 'चांगले वागण्यास' भाग पाडू शकतो. भारतापुढे आता कायमच हे भय असणार आहे. चीनकडून त्याबाबत ठाम आश्वासन घेणे हा उपाय आता भारताच्या हाती आहे. या धरणाविरोधात सरकारकडून या धोक्याची तीव्रता कमी करण्याचे

# लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना आवडणारा 'चॉकटेल पॅनकेक' आता घरीच बनवा, वाचा सोपी रेसिपी



संध्याकाळच्या वेळी छोटी मोठी भूक लागल्यानंतर बाहेरून विकत आणलेले पदार्थ खाण्यापेक्षा घरी सोप्या पद्धतीमध्ये चॉकलेट पॅनकेक नक्की बनवून पहा. तुम्ही बनवलेला पदार्थ सगळ्यांना नक्कीच आवडेल. जाणून घ्या रेसिपी.

लहान मुलांना संध्याकाळच्या वेळी छोटी मोठी भूक लागल्यानंतर सतत त्यांना बाहेरून विकत आणलेले पदार्थ खाण्यास दिले जातात. पण नेहमी नेहमी बाहेरचे तेलकट तिखट पदार्थ खाणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे सतत बाहेरच्या पदार्थांचे सेवन करू नये. अशावेळी तुम्ही मुलांना झटपट चॉकलेट पॅनकेक बनवून खाण्यास देऊ शकता. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं चॉकलेट खायला खूप आवडत. पण नुसतेच चॉकलेट खाण्याऐवजी तुम्ही चॉकलेटपासून पॅनकेक बनवून देऊ शकता.हा पदार्थ तुम्ही घरातील पार्टीच्या वेळी किंवा पाहुणे आल्यानंतर सुद्धा बनवू शकता.पॅनकेक हा पदार्थ खूप कमी साहित्यामध्ये झटपट तयार होतो. तुम्ही बनवलेले पॅनकेक घरातील सगळ्यांना नक्कीच आवडतील. चला तर जाणून घेऊया चॉकलेट पॅनकेक बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

चॉकलेट बिस्किटे
कोको पावडर
बेकिंग सोडा
दूध
चॉकलेट स्प्रेड

कृती:

चॉकलेट पॅनकेक बनवण्यासाठी सर्वप्रथम, तुमच्या आवडीचे कोणतेही चॉकलेट बिस्कीट घेऊन मिक्समधून त्यांची बारीक पावडर तयार करून घ्या.

तयार केलेली बिस्किटांची पावडर वाटीमध्ये घेऊन त्यात कोको पावडर आणि बेकिंग सोडा घालून मिक्स करा.

नंतर त्यात आवश्यकतेनुसार दूध घालून मिक्स करा. मिश्रण जास्त पातळ बनवू नये.

पॅनकेक बनवण्यासाठी पॅन गरम करून त्यात छोटे छोटे पॅनकेक टाकून दोन्ही बाजूने भाजून घ्या.

सर्व्ह करताना पॅनकेक वर चॉकलेट स्प्रेड टाकून खाण्यासाठी सर्व्ह करा.

तयार आहेत सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले चॉकलेट पॅनकेक.

# भारतासह 'या' देशांमध्येही साजरी होते मकर संक्रांती; जाणून घ्या काय आहे खास परंपरा



मकर संक्रांतीचा सण दरवर्षी भारतात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. यावर्षी १४ जानेवारील मकर संक्रांत साजरी करण्याच येईल. तसेच हा सण भारतासह परदेशातही साजरा करण्यात येतो.

चरज्ञरी ङरपज्ञीरपींळ २०२५: मकर संक्रांतीचा सण दरवर्षी भारतात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. यंदा २०२५ ला १४ जानेवारीला यंदा मकर संक्रांत साजरा केला जाईल. मकर संक्रांती म्हणजेच उत्तरायण हा सण सूर्य मकर राशीत प्रवेश केल्यावर येतो. भारतात हा सण वेगवेगळ्या नावाने आणि परंपरांनी ओळखला आणि साजरा केला जातो. महाराष्ट्रात तिळगुळाचे महत्त्व, पंजाबमध्ये लोहरी, तामिळनाडूमध्ये पोंगल, तर आसाममध्ये भोगाली बिहू या नावाने साजरा होणारा हा सण विविधतेने नटलेला आहे.

मात्र, भारताबाहेरही काही देशांमध्ये मकर संक्रांतीला अनोख्या पद्धतीने साजरे केले जाते. चला जाणून घेऊया मकर संक्रांती कशा पद्धतीने आणि कुठल्या नावाने परदेशात साजरी केली जाते. तर, मकर संक्रांती भारतासह, थायलंड, म्यानमार आणि श्रीलंका या देशांमध्ये साजारा करण्यात येतो.

पोंगल २०२५ कधी आहे? कसा साजरा केला जातो हा सण? जाणून घ्या यामागची पौराणिक कथा

चला तर मग जाणून घेऊयात या देशांमध्ये कशाप्रकारे हा सण साजरा केला जातो.

भारताच्या दक्षिणेला भागात असलेल्या श्रीलंकेतही मकर संक्रांती साजरी केली जाते. या देशात या सणाला उजहावर थिरानाल म्हणतात. विशेषतः तामिळ समाजात हा सण पोंगल नावाने ओळखला जातो. तांदळाच्या नवीन पिकाचे स्वागत करण्यासाठी आणि निसर्गाला कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्रीलंकन तामिळ समुदाय हा सण मोठ्या आनंदाने साजरा करतो. घराघरात गोड पदार्थ बनवले जातात आणि गायी-वासरांना सजवून त्यांची पूजा केली जाते.

म्यानमार - थिनाग्यान

तसेच, म्यानमारमध्ये देखील मकर संक्रांती थिनाग्यान नावाने ओळखली जाते. म्यानमारमध्ये हा हा उत्सव बौद्ध परंपरांशी जोडलेला आहे आणि नवीन वर्षाच्या आगमनाचा प्रतीक मानला जातो. म्यानमारमध्ये हा सण ३ ते ४ दिवस चालतो. या काळात लोक एकमेकांना शुभेच्छा देतात, धार्मिक विधी करतात आणि जलक्रीडा उत्सव साजरा करतात. या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रम आणि बौद्ध धर्मगुरुंच्या शिकवणीला मिळणारे महत्त्व.

थायलंड - सॉन्गकर्न

म्यानमान आणि श्रीलंकेशिवाय, थायलंडमध्येही मकर संक्रांती सॉन्गकर्न म्हणून ओळखण्यात येते. थायलंडमध्ये 'हा' सण पतंग उडवण्याच्या अनोख्या परंपरेसाठी प्रसिद्ध आहे. प्राचीन काळी थायलंडमधील राजे देवाला समर्पण म्हणून विशेष पतंग उडवत असत. याशिवाय, थायलंडमधील लोक या काळात पारंपरिक प्रार्थना करतात आणि भिक्षूंना अन्नदान करतात. हा सण समृद्धी, आनंद, आणि शांततेचे प्रतीक मानला जातो.

उत्सवांचे वैशिष्ट्य

भारताप्रमाणेच या देशांमध्येही मकर संक्रांतीचा सण ऋतू परिवर्तन, नवीन वर्षाचे स्वागत आणि निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो. सांस्कृतिक विविधतेने नटलेला हा सण जगभरात मानवतेचा संदेश देतो. भारताबाहेरही या सणाचे महत्त्व त्याच्या प्राचीन परंपरांमध्ये जपले गेले आहे.

# वयाच्या ५० मध्ये २५ वर्षांचे तरूण दिसण्यासाठी त्वचेवर लावा 'या' फळाची साल, त्वचा होईल सुंदर



त्वचेसंबंधित समस्या उद्भवू लागल्यानंतर अनेक महिला केमिकल युक्त प्रॉडक्टचा वापर करतात. मात्र असे करण्याऐवजी घरगुती पदार्थांचा वापर करून त्वचेची काळजी घ्यावी. डेड स्किन घालवण्यासाठी या पद्धतीने करा केळीच्या सालीचा वापर.

वय वाढल्यानंतर त्वचेमध्ये अनेक बदल होण्यास सुरुवात होते. त्वचेमध्ये होणाऱ्या बदलांकडे अनेकदा महिला दुर्लक्ष करतात. मात्र हेच छोटे बदल पुढे जाऊन मोठे होण्याची शक्यता असते. त्यामुळे त्वचेच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.मी महिला त्वचा सुंदर दिसण्यासाठी सतत काहींना काही उपाय करत असतात. मात्र तरीसुद्धा त्वचा सुंदर आणि चमकदार दिसत नाही. त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यासाठी अनेक महिला बाजारात उपलब्ध असलेल्या ब्युटी क्रीम्स आणून लावतात. मात्र या सगळ्याचा काहीच परिणाम त्वचेवर दिसत नाही. केमिकल युक्त प्रॉडक्टमुळे सुंदर त्वचा खराब होऊन जाते. त्वचेची गुणवत्ता खराब झाल्यानंतर ती सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला त्वचेसंबंधित समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी कोणत्या फळाच्या सालीचा वापर करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया. (फोटो सौजन्य - ळडींलज्ञ)

'या' पद्धतीने करा केळीच्या सालीचा वापर:

केळी खाल्ल्यानंतर केळ्याची साल फेकून दिली जाते. मात्र असे न करता तुम्ही केळीच्या सालीचा वापर त्वचेच्या समस्येंपासून सुटका मिळवण्यासाठी करू शकता. यामुळे तुमची त्वचा स्वच्छ आणि सुंदर होईल. यासाठी केळीची साल घेऊन त्याच्या आतील भाग हळुवार हाताने चेहऱ्यावर लावून मसाज करा. १० पमिनिटं मसाज केल्यानंतर काहीवेळ त्वचा अशीच ठेवून नंतर पाण्याने त्वचा स्वच्छ करून घ्या. यामुळे तुमची त्वचा नैसर्गिकपणे सुंदर आणि चमकदार दिसेल.

टॅनिंग घालवण्यासाठी सोपा उपाय:

उन्हात गेल्यामुळे किंवा वातावरणातील बदलांमुळे त्वचा काळवंडून जाते. काळी पडलेली त्वचा उजळवण्यासाठी महिला सतत काहींना काही करत राहतात. मात्र असे करण्याऐवजी घरगुती उपाय करून त्वचेच्या आरोग्याची काळजी घ्यावी. काळी पडलेली त्वचा उजळवण्यासाठी केळीची साल घेऊन त्याच्या आतील भाग त्वचेवर हळुवार हाताने लावून मसाज करा. त्यानंतर त्वचा पाण्याने स्वच्छ धुवा. हा उपाय केल्यामुळे त्वचेवरील टॅनिंग निघून जाईल आणि त्वचा स्वच्छ दिसेल.

डेड स्किन घालवण्यासाठी सोपे उपाय:

त्वचेची गुणवत्ता सुधारण्यासाठी अनेक महिला सतत काहींना काही उपाय करत असतात. मात्र हे उपाय करण्याऐवजी केळीच्या सालीचा वापर करून त्वचा उजळदार बनवा. यासाठी केळीच्या सालीच्या आतील भाग त्वचेवर लावून हलक्या हाताने मसाज करून घ्या. त्यानंतर त्वचा पाण्याने स्वच्छ धुवा. यामुळे डेड स्किन निघून जाऊन त्वचा चमकदार होईल.

टीप - हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# मनात येणाऱ्या नकारात्मक विचारांमुळे त्रस्त आहात? मग प्रेमानंद महाराजांनी सांगितलेले 'हे' उपाय ठरतील प्रभावी

मनात येणाऱ्या नकारात्मक आणि चुकीच्या विचारांमुळे अनेक लोक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला प्रेमानंद महाराजांनी सांगितलेले काही सोपे उपाय नक्की करून पहा. यामुळे तुमच्या मनाला शांती मिळेल.

जीवन जगताना मानसिक आणि शारीरिक आरोग्य निरोगी असेल तर जीवन जगताना आनंद आणि उत्साह निर्माण होतो. पण काही लोक सतत कोणत्या ना कोणत्या विचारांमध्ये नेहमीच व्यस्थ असतात. आजूबाजूला नेमकं काय चालू आहे, याकडे सुद्धा कधी त्यांचे लक्ष नसते. मनात नेहमी नकारात्मक विचार आल्यामुळे मानसिक स्थिती पूर्णपणे विस्कटून जाते. सतत नकारात्मक विचार केल्यामुळे शारीरिक आरोग्यावर सुद्धा गंभीर परिणाम दिसून येतात. बिघडलेले मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी लोक अनेक प्रयत्न करतात. मात्र तरीसुद्धा मानसिक आरोग्य सुधारले जात नाही. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला मनात येणारे नकारात्मक विचार कमी करण्यासाठी वृंदावनचे प्रेमानंद महाराज यांनी सांगितलेले काही सोपे आणि प्रभावी उपाय सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

जगभरात सगळीकडे वृंदावनचे प्रेमानंद महाराज प्रसिद्ध आहेत. देश विदेशामध्ये त्यांची भक्ती करणारे अनेक लोक आहेत. प्रेमानंद महाराज यांच्या दर्शनासाठी अनेक लोक लांबून लांबून जातात. शिवाय प्रेमानंद महाराज भक्तांच्या मनात निर्माण झालेल्या सर्व शंकांचे निरसन करतात. त्यांचे विचार अनेकांसाठी प्रेरणा देणारे आहेत. मनात येणारे नकारात्मक विचार कमी करण्यासाठी जाणून घेऊया प्रेमानंद महाराज यांनी सांगितलेले सोपे उपाय.

मनात येणारे नकारात्मक विचार कमी करण्यासाठी सोपी उपाय:

देवाच्या नावाचा जप करणे:

जेव्हा मनात सतत वाईट आणि चुकीचे विचार येतात, तेव्हा देवाच्या नावाचा जप करावा. देवाचे नामस्मरण करण्यास सुरुवात करावी. यामुळे नकारात्मक विचार कमी होतात. देवाचे नामस्मण केल्यामुळे मनातील नकारात्मक विचार दूर होतात आणि मन शांत होते.

देवाचे नियमित नामस्मरण करणे:

प्रेमानंद महाराज यांनी सांगितल्यानुसार, गवंताचे नामस्मरण नियमित केल्याने मनातील नकारात्मक विचार हळूहळू दूर होतात. चांगले विचार करण्याची ऊर्जा मनात निर्माण होते. तसेच यामुळे अधिक चांगले आणि सकारात्मक विचार मनात येतात आणि हळूहळू वाईट विचार निघून जातात.

देवाच्या नावामधील अद्भुत शक्ती:

भगवंताच्या नामात अद्भुत शक्ती आहे. नुसते नामस्मरण केल्याने मनात सकारात्मक भावना निर्माण होतात आणि नकारात्मक विचार कायमचे दूर जातात. त्यामुळे कितीही जीवनात धावपळ असेल तरीसुद्धा देवाच्या नावाचा जप करणे आवश्यक आहे.

तणावापासून दूर राहणे:

प्रेमानंद महाराज यांनी सांगितल्यानुसार, मनामध्ये वाईट विचार येऊ नयेत म्हणून तणाव दूर करणे आवश्यक आहे. नेहमी नेहमी तणावात राहिल्यामुळे आनंद निघून जातो. तसेच यामुळे मन अशांत होऊन जाते आणि मनामध्ये नकारात्मक वाईट विचार येतात. मनामध्ये जास्त नकारात्मक विचार येण्यास सुरुवात झाल्यानंतर देवाचे नामस्मरण करावे. अध्यात्माशिवाय मनातील नकारात्मक भावना थांबवणे कठीण आहे.

परमेश्वराच्या नावाचा गौरव करणे:

प्रेमानंद महाराज यांनी सांगितल्यानुसार, सनातन धर्मात असे सांगितले आहे की भगवंताच्या नामाचा महिमा करता येत नाही. नामस्मरणानेच त्याचा महिमा कळू शकतो. जीवनातील संकटे आणि समस्यांपासून मुक्ती मिळवण्यासाठी भगवंताच्या नामाचा आधार घेतला पाहिजे. भगवंताचे नामस्मरण केल्याने मनातील सर्व प्रकारच्या चिंता आणि वाईट विचारांपासून मुक्ती मिळते.

# हिवाळ्यात तुम्हीसुद्धा थंड पाण्याने अंघोळ करता! मग जाणून घ्या शरीरावर होणारे परिणाम

थंडीच्या दिवसांमध्ये अनेक लोक थंड सकाळच्या वेळी थंड पाण्याने अंघोळ करतात. मात्र थंड पाण्याने अंघोळ करणे शरीरासाठी घातक ठरू शकते. जाणून घेऊया थंड पाण्याची अंघोळ केल्यामुळे शरीराला होणारे फायदे आणि तोटे.

वातावरणात सतत होणाऱ्या बदलांचा परिणाम आरोग्यावर दिसून येतो. थंडीसह इतर सर्वच ऋतूंमध्ये आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. वातावरणात बदल झाल्यानंतर खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये अनेक बदल केले जातात. वातावरण थंड असल्यामुळे कुठेही बाहेर फिरायला जाताना अनेक गोष्टी घेऊन बाहेर जावे लागते. थंडीच्या दिवसांमध्ये आहारात गरम आणि उष्ण पदार्थांचे सेवन करावे. ज्यामुळे शरीर आतूनसुद्धा उष्ण होते. अनेक लोक दिवसभर काम करून थकून घरी आल्यानंतर अंघोळ करतात.अंघोळ केलं;यामुळे शरीर स्वच्छ राहते. पण काहींना थंडीच्या दिवसांमध्ये सुद्धा थंड पाण्याची अंघोळ करण्याची सवय असते. मात्र ही सवय आरोग्याच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. थंडीच्या दिवसांमध्ये गरम पाण्याने अंघोळ केल्यास शरीराला अनेक फायदे होतील. (फोटो सौजन्य - )

शरीर स्वच्छ करण्यासाठी नियमित अंघोळ करणे आवश्यक आहे. नियमित अंघोळ केल्यामुळे शरीराला आणि मनाला शांती मिळते. शिवाय आरोग्य सुधारण्यास मदत होते. कामावरून थकून आल्यानंतर किंवा इतर वेळी बाहेर फिरून आल्यानंतर कामाचा थकवा घालवण्यासाठी अंघोळ करणे आवश्यक आहे. त्यामुळे रोजच्या दैनंदिन जीवनात थंड किंवा गरम पाण्याने अंघोळ करू शकता.त्यामुळे आज म्ही तुम्हाला हिवाळ्यात थंड पाण्याने अंघोळ केल्यावर शरीरावर नेमके काय परिणाम होता, याबद्दल सांगणार आहोत.

# महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी नंदकुमार गादेवार यांची बिनविरोध निवड.

नायगाव / प्रतिनिधी :– महाराष्ट्र महासभेचे सर्वसाधारण सभा व कार्यकारणी मंडळाची निवड बैठकीत अध्यक्षपदासाठी नंदकुमार गादेवार यांच्या नावाच्या सर्वानुमते चर्चा होऊन बिनविरोध निवड करण्यात आली निवड होताच निवडीचे अतिशय बाजीत पेढे वाटून गुलाल उधळून समाज बांधवांनी स्वागत केले. महाराष्ट्रावर आर्य वैश्य महासभेच्या त्रैवार्षिक निवड दिनांक ५ जानेवारी रविवारी सकाळी दहा वाजता वासवी मंगल कार्यालय नवीन नांदेड येथे महाराष्ट्र कार्यवाही महासभेचे सर्व सदस्य यांच्या उपोषण घेण्यात आली होती यामध्ये सर्वानुमते बिनविरोध महाराष्ट्र प्रदेश आर्यवैश्य महासभा निवडणूकीत अध्यक्ष पदावर मा.नंदकुमार गादेवार कार्याध्यक्ष पदासाठी मा.भानुदास वट्टमवार, महासचीव पदावर मा.गोंवीदराव बिडवई,




कोषाध्यक्ष पदावर मा.ज्ञानेश्वर महाजन, बांधकाम समीती सभापदी मा.डॉ.सूर्यकांत शिरपेवार, बांधकाम समिती सचिव पदी सदानंद मेडेवार यांची बीनविरोध निवड झाल्याबद्दल सर्व पदाधिकार्यांचे सर्वत्र आर्य वैश्य समाज बांधवांनी ढोल ताशाच्या गजरात गुलाल उधळून फटाके वाजून अतिश बाजी करून पेढे वाटून जल्लोषात स्वागत करण्यात आले

# बंसल क्लासेस केज व कळंब शाखा आयोजित टॅलेंट सर्च परीक्षेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## जवळपास ५ हजार विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा!

केज/प्रतिनिधी –बंसल क्लासेस केज व कळंब शाखेने इयत्ता ४ थी ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट सर्च परीक्षेचे आयोजन केले होते. दिनांक १५ डिसेंबर २०२४ आणि दिनांक ५ जानेवारी २०२५ अशा दोन फेऱ्यांमध्ये ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शंभर टक्के पर्यंत शैक्षणिक स्कॉलरशिप आणि प्रथम ३ विद्यार्थ्यांना अनुक्रमे मोबाईल टॅब, सायकल आणि डिजिटल वॉच असे बक्षीस देण्यात येणार आहे. गेल्या ४ वर्षांपासून बंसल क्लासेस केज शहरात तर २ वर्षांपासून कळंब शहरात शैक्षणिक सेवा देत आहे. विद्यार्थ्यांचे निकाल, शैक्षणिक सुविधा, राजस्थान कोटा येथील शिक्षक, विद्यार्थी गुणवत्ता विकास आणि विद्यार्थी शिस्त व सुरक्षा इत्यादी गोष्टींमुळे बंसल क्लासेस पालक व विद्यार्थ्यांमध्ये प्रसिद्धीस येत आहे. अनेक पालकांनी या प्रसंगी आपल्या पाल्यांसाठी बंसल क्लासेस प्रवेशासाठी नावनोंदणी



देखील सुरू केली आहे. मर्यादित विद्यार्थी आणि सर्वोत्तम निकाल अशी ओळख बंसल क्लासेसने दोन्ही शहरात निर्माण केली आहे. देशात, राज्यात, विभागात आणि जिल्हा स्तरावर बंसल क्लासेस केज व कळंब शाखेच्या विद्यार्थ्यांनी आपला झेंडा रोवला आहे. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शालेय स्पर्धा परीक्षेत विद्यार्थी फक्त यशच मिळवत नाहीयेत,तर प्रथम व द्वितीय येऊन केज व कळंब शहराचे नाव मोठे करत आहेत. टॅलेंट सर्च परीक्षेच्या माध्यमातून यावर्षी देखील विद्यार्थी व पालकांनी बंसल क्लासेसला उत्स्फूर्त प्रतिसाद दिलेला आहे. तसेच बंसल क्लासेसमध्ये प्रवेश घेण्यासाठी पूर्व नावनोंदणी सुरू केली आहे. विद्यार्थी व पालकांनी दिलेल्या या प्रतिसादाबद्दल विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन करत पुढील काळात आणखी जास्त ताकदीने आपण बंसल क्लासेसच्या माध्यमातून केज व कळंब शहरात उत्कृष्ट शैक्षणिक सेवा पुरवू अशी ग्वाही बंसल क्लासेस कळंब व केज शाखेचे संचालक हारूणभाई इनामदार, यासीन इनामदार, सह–संचालक गोविंद ठोंबरे यांनी दिली. कळंब शाखेचे व्यवस्थापक सचिन बडे, केज शाखेच्या व्यवस्थापक हूमेरा शेख व सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी टॅलेंट सर्च परीक्षेचे पूर्ण आयोजन व नियोजन यशस्वीरीत्या पार पाडले.

# सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी प्रयत्न करा–डॉ. पी. पी. वावा

लातूर, दि. ०७ : आपल्या शहराची स्वच्छता राखण्यात महत्वाची भूमिका बजाविणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेवून प्रयत्न करावेत, असे राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी. पी. वावा यांनी आज सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे जिरेंदर नाथ, संदीप चरण, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, पोलीस उपाधीक्षक गजांनन भातलवांडे, नगरपालिका प्रशासनचे सहआयुक्त मंगेश शिंदे, सहायक कामगार आयुक्त मंगेश झोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



सफाई कर्मचारी यांनी सफाई काम करताना आवश्यक खबरदारी घेणे आवश्यक आहे. हातमोजे, मास्क, बूट आदी साधनांचा वापर करण्याबाबत त्यांना सूचना द्याव्यात. तसेच त्यांची नियमित आरोग्य तपासणी करून आवश्यक लसीकरण करावे. लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार सर्व पात्र सफाई कर्मचाऱ्यांना लाभ देण्यात यावेत. प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याला ओळखपत्र देवून त्यावर कर्मचाऱ्याची आरोग्यविषयक माहिती, ईपीएफ क्रमांक नमूद करावा, असे डॉ. वावा म्हणाले. सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना इतर व्यवसाय उभारणीसाठी सहाय्य करावे. यासाठी बँकेने विशेष मेळावे आयोजित करावेत. सफाई कर्मचारी यांना पदोन्नती, आश्वासित प्रगती योजनेचे लाभ विहित कालावधीत देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यात सफाई कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न घेण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका यांनी चांगले काम केले आहे. पदोन्नती, आश्वासित प्रगती, लाड पागे समिती शिफारसीनुसार वारसांना नियुक्ती आदी प्रकरणे तातडीने निकाली काढून सफाई कर्मचाऱ्यांना लाभ देण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे म्हणाल्या.

लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार सफाई कर्मचाऱ्यांच्या ८३ वारसांना लातूर शहर महानगरपालिकेने नियुक्ती दिली आहे. यापैकी निवडक कर्मचाऱ्यांना यावेळी डॉ. वावा यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात नियुक्तीपत्रे वितरीत करण्यात आली आहे. तसेच निवृत्त सफाई कामगारांना लाभाचे धनादेश वितरीत करण्यात आले. सखी महिला बचतगटाच्या माध्यमातून होत असलेल्या स्वच्छता विषयक कामाबद्दल या बचतगटाचा यावेळी सन्मान करण्यात आला. नगरपालिका प्रशासनचे सहआयुक्त मंगेश शिंदे यांनी सफाई कर्मचाऱ्यांसाठी राबवण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

# उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत आज लातूर येथे विभागीय व जिल्हास्तरीय उल्लास मेळावा

लातूर, दि. ०७ : केंद्र सरकार पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत विभागीय व जिल्हास्तरीय उल्लास मेळावा बुधवार, ८ जानेवारी २०२५ रोजी पेठ येथील किडीज इन्फो पार्क स्कूल येथे आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १० वाजता या मेळाव्याचे उद्घाटन लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते होणार आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, शिक्षण संचालक (योजना) डॉ. महेश पालकर, लातूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य डॉ. भागिरथी गिरी यांच्यासह लातूर, नांदेड व धाराशिव या तीनही जिल्ह्यातील सर्व विभागांचे शिक्षणाधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत.

विभागीय व जिल्हास्तरीय मेळाव्याची सुरुवात साक्षरता वारीने होणार असून यामध्ये जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. यानिमित्ताने आयोजित शिक्षण पालखीला सकाळी ७.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथून सुरुवात होणार आहे. लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजीव गांधी चौक दरम्यान ही साक्षरता वारी निघणार असून यामध्ये साक्षरतेचे महत्व विविध वेशभूषेतील विद्यार्थी अधोरेखित करणार आहेत.

यामध्ये लातूरमधील आर.एन.मोटेगावकर विद्यालय, ज्ञानप्रकाश माध्यमिक विद्यालय, हरंगुळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देशिकेंद्र विद्यालय, श्री श्री रविशंकर विद्यालय, श्री व्यंकटेश माध्यमिक विद्यालय, स्वामी विवेकानंद विद्यालय, केशवराज विद्यालय, ज्ञानेश्वर विद्यालय व किडीज इन्फो पार्क स्कूल या विद्यालयातील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. तसेच वेगवेगळ्या महापुरुषांच्या वेशात शिक्षक व शिक्षिका सहभागी होणार आहेत.

त्यानंतर किडीज इन्फो पार्क येथे उल्लास मेळाव्याचे उद्घाटन होणार असून या ठिकाणी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले जाणार आहे. यामाध्यमातून उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमाचे महत्त्व पटवून दिले जाणार आहे. या मेळाव्यामध्ये लातूर जिल्ह्यासह नांदेड व धाराशिव जिल्ह्यांचे वेगवेगळे स्टॉल लागणार आहेत. याद्वारे साक्षरतेविषयी जनजागृती केली जाणार असून नुकतेच साक्षर झालेल्या नवसाक्षर व त्यांना शिकवलेल्या स्वयंसेवकांचे मनोगत यावेळी सादर होणार आहेत. जि ल्ह्यात नवभारत साक्षरता कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य केलेल्या तालुक्यंचा सन्मान यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते केला जाणार आहे. एक दिवसीय मेळाव्यासाठी जिल्ह्यातील असाक्षर, पालक, शिक्षक व विद्यार्थी यांनी उपस्थित राहून उभारलेल्या विविध स्टॉलला भेट देण्याचे आवाहन लातूरच्या शिक्षणाधिकारी (योजना) तृप्ती अंधारे यांनी केले आहे.

# लातूर जिल्ह्यातील उद्योगांनी उद्यम नोंदणी करण्याचे आवाहन

लातूर, दि.७ :– एमएसएमईडी कायदा –२००६ अंतर्गत उद्योगासाठी ज्ञापन स्विकृती कायदा सन २००६ पासून लागू करण्यात आला आहे. या कायद्यातंर्गत उद्यम ज्ञापन स्वीकृतीपत्र, नोंदणीपत्र ऑनलाईन प्राप्त होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी लातूर जिल्ह्यातील सर्व उत्पादन करणारे उद्योग घटक, सेवा उद्योग व इतर व्यवसाय करणारे व्यावसायिक यांनी उद्यम नोंदणी करावी, असे कळविले असूनही नोंदणी विनाशुल्क आहे.यासाठी उद्योगांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

यामध्ये यंत्र सामुग्री गुंतवणूक १ कोटी रुपये आणि आर्थिक उलाढाल ५ कोटी रुपये पर्यंत असलेल्या उद्योगांचा समावेश सुक्ष्म उद्योगात , यंत्रस सामुग्री गुंतवणूक १० कोटी रुपये आणि आर्थिक उलाढाल ५० कोटी रुपयेपर्यंत यंत्रसामुग्री गुंतवणूक आणि २५० कोटी रुपये आर्थिक उलाढाल मर्यादा असेलल्या उद्योगांचा समावेश मध्यम उद्योगात करण्यात आला आहे. त्यानुसार उद्योजकांनी आपल्या उद्योगांची नोंदणी हीींिं:// ीूरीशसळींींरींळेप.सीीं. ळप या संकेतस्थळावर करावी, असे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके यांनी आवाहन केले आहे.

# ज्ञानप्रकाशच्या ‘देणे निर्सगाचे... बंध नात्यांचे’ या स्नेहसंमेलनातून हृदयस्पर्शी संदेश

लातूरच्या शैक्षणिक जगतात स्वतःचे वेगळेपण सिद्ध करणाऱ्या ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प द्वारा देणे निसर्गाचे बंध नात्यांचे हा सांस्कृतिक महोत्सव दिनांक ४ जानेवारी शनिवार रोजी दगडोजीराव देशमुख सभागृहात संपन्न झाला..

ज्ञानप्रकाशच्या स्नेहसंमेलनातून मुलांना शिकण्याच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जातात . अशाच प्रकारचे दर्जेदार स्नेहसंमेलने ज्ञानप्रकाशच्या मुलांनी रंगमंचावर मागील २५वर्षात सादर केली आणि ती कायम स्मरणात राहिली . देणे निसर्गाचे बंध नात्यांचे सर्वांचा जिव्हाळ्याचा विषय घेऊनयावर्षीचे स्नेहसंमेलन संपन्न झाले. .




कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप– प्रज्वलन व नटराज मूर्तीचे पूजन हार्ट स्पेशालिस्ट माननीय डॉ. संजय शिवपुजे सर व मधुमेह तज्ज्ञ स्नेहल शिवपुजे यांच्या हस्ते झाले. तर उद्घाटन बालरंगभूमी संमेलनामध्ये सादरीकरण केलेल्या मुलांच्या तबला वादनाने झाले.

यानंतर वैद्यकीय, सामाजिक सांस्कृतिक, प्रशासकीय, शैक्षणिक व कृषी अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ज्ञानप्रकाशच्या पालकांचा सन्मान रौप्य महोत्सवी वर्षापासून ज्ञानप्रकाश ने केला आहे तसाच याही वर्षी केला. यामध्ये प्रशासकीय सेवेत भरीव कामगिरी म्हणून श्री लालासाहेब राजाभाऊ पुजारी, शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल श्री प्रमोद नरसिंग कटके,पत्रकारितेत भरीव कामगिरीसाठी इस्माईल सलीम शेख तर वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल डॉ. सचिन सोमनाथ बालकुंदे यांचे प्रमुख पाहुणे शिवपुजे सर व स्नेहल शिवपुजे मॅडम व ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाचे प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे संचालिका व मुख्याध्यापिका सविता नरहरे ,पालक समितीचे सदस्य ,पोलीस उपनिरीक्षक संदिप कराड यांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.याप्रसंगी नरहरे सरांचे माजी विद्यार्थी डॉ. सचिन बालकुंदे सर यांच्या कोविड स्टोरी ग्लोबल टू लोकल या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले .

माणसाच्या समाजशील वृत्तीमुळे समाजाचे व निसर्गाचे देणे म्हणून सामाजिक व कौटुंबिक स्तरावर अनेक नातेसंबंध निर्माण होतात हे नातेसंबंध जपण्याची त्याच्या मनाची स्वाभाविक ओढ असते ही नाती अनेक रंगी अनेक पदरी असतात त्यातूनच मनुष्याचे भाव विश्व समृद्ध होत असतं .. आजच्या धकाधकीच्या जीवनात नातेसंबंध कुठेतरी दुरावताना दिसतात याची जाणीव तसेच काही नाते रक्ताची नसतात पण काही त्याहूनही सरस ठरणारी असतात .

मैत्रीशी, निसर्गाशी, देशाशी, मातीशी असणाऱ्या अशा नात्यांचा विषय घेऊन रंगमंचावर नृत्य ,नाटिका यांचे उत्कट सादरीकरण झाले .

यावर्षीचे वैशिष्ट्य म्हणजे स्नेहसंमेलनातील सादरीकरणांमध्ये काही गटांच्या आई– बाबा पालकांनीही मुलांसह नृत्य सादर केले. पालकांनी आई–बाबांच्या भाव विश्वातील गाणे नृत्यातून सादर केले. ज्ञानप्रकाशने सुचविलेल्या सर्वच गोष्टी पालक खूप मनापासून करतात त्यामुळे या विशेष सादरीकरणाचा आनंद सर्वांना घेता आला. संस्कृतीशी असलेले नाते रंगांशी असलेले नाते मैत्रीशी नाते निसर्गाशी नाते खेळ व मातीशी असलेल्या नात्यांवर आधारित वेगवेगळे नृत्य व निशब्द करणारी आधार ही नाटिका तर विनोदी नाटिका नाकापेक्षा मोती जड अशा कार्यक्रमाच्या चढत्या आलेखानंतर हे बंध नात्यांचे या नृत्याविष्काराने सांस्कृतिक महोत्सवाची सांगता झाली.

या सांस्कृतिक महोत्सवाचे सूत्रसंचालन संपदाताई व वार्षिकआढावा माधवी ताईंनी सादर केला. तर कार्यक्रमाचे मुख्य प्रस्ताविक ज्ञानप्रकाश प्रतिष्ठानचे अध्यक्ष व प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे यांनी केले.

भाग्यश्रीताई यांनी नृत्य तर वसुधाताई, तृप्ती ताई व पांचाळ सर यांनी नाटिका बसवली व स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या ज्ञानप्रकाशच्या शिक्षकांचे मनापासून अभिनंदन केले व ज्ञानप्रकाशच्या पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE